MHWS100005692023

| | | | |
|---|---|---|---|
| दाखल तारीख | ३१ | ०३ | २०२३ |
| नोंदणी तारीख | ३१ | ०३ | २०२३ |
| निकाल तारीख | ११ | ०६ | २०२६ |
| कालावधी | ०३ वर्षे | ०२ महिना | ११ दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालय, मालेगांव.**

(शेख मोहम्मद वसीम अक्रम, पिठासीन अधिकारी)

**नियमित फौजदारी खटला क्र.७०/२०२३** **नि.क्र. ४६**

**महाराष्ट्र शासनतर्फे,**
प्रभारी अधिकारी,
शिरपुर पोलीस स्टेशन,
ता. मालेगांव, जि. वाशिम. **सरकार**

**विरुद्ध**

१. **श्रीकांत वसंता खिल्लारे**
वयः २२ वर्षे, व्यवसायः मजुरी,

२. **पंचफुला वसंता खिल्लारे**
वयः ५२ वर्षे, व्यवसायः मजुरी,

३. **मंगल संतोष पडघान**
वयः ३० वर्षे, व्यवसायः मजुरी,
सर्व रा. करंजी, ता. मालेगांव, जि. वाशिम. **आरोपी**

**भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५२, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये दंडणीय अपराध**

---

अभियोगपक्षातर्फे विद्वान विधिज्ञ – सौ.एम.एस.सुपारे
आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ – श्री.एस. जी. सावळे

---

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of offence) | २०/०९/२०२२ |

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | २०/०९/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of Chargesheet) | ३१/०३/२०२३ |
| दोषारोप/प्रतिकथन नोंदविल्याचा दिनांक (Date of framing of Charge/Particular) | २२/०४/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक (Date of commencement of Evidence) | २६/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक (Date on which Judgment is reserved) | युक्तीवाद ऐकल्यानंतर तात्काळ न्यायनिर्णय देण्यात आला. |
| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक (Date of the Judgment) | ११/०६/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of sentencing Order, if any) | – |

| अ.क्र. (Rank of the accused) | आरोपीचे नाव (Name of accused) | अटक केल्याचा दिनांक (Date of arrest) | जमानतीवर सोडल्याचा दिनांक (Date of release on bail) | कलम (Offence charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentenced imposed) | न्यायाधीन बंदी असल्याची तारीख कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीकांत वसंता खिल्लारे | अटक नाही | १०/०८/२०२३ | भा.दं.वि चे कलम ४५२, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष | – | – |
| २ | पंचफुला वसंता खिल्लारे | अटक नाही | | | निर्दोष | – | – |
| ३ | मंगल संतोष पडघान | अटक नाही | | | निर्दोष | – | – |

## न्यायनिर्णय

(दिनांक ११/०६/२०२६ रोजी पारित )

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५२, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ नुसार शिक्षा पात्र गुन्ह्याकरिता अभियोगपक्षातर्फे दाखल करण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षाचे संक्षिप्त कथन असे आहे की, कथित घटना दिनांक २०/०९/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी संगीता खिल्लारे हिच्या घरी, मौजा करंजी, ता. मालेगांव, जि. वाशिम येथे घडली होती. कथित घटनेच्यावेळेस सर्व आरोपींनी एकमेकांसोबत संगनमत करून समान उद्देश ठेउन अनाधिकाराने व अनाधिकृतपणे फिर्यादीच्या घरात घुसुन फिर्यादी, फिर्यादीची जाऊ विजयानंद खिल्लारे व अंकीता पोफळे यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन जीवाने मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर फिर्यादीने सदरील घटनेबाबत पोलीस स्टेशन, शिरपुर येथे आरोपींविरुद्ध फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीने कथित घटनेच्या दिलेल्या फिर्यादवरुन ठाणे अंमलदार यांनी गुन्हा क्र.२७३/२०२२ नोंदविला.

३. तपासी अंमलदाराने तपासाच्या दरम्यान फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा तयार केला तसेच तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझ्या पूर्व पिठासीन अधिकाऱ्यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.२३ प्रमाणे भारतीय दंड विधान कलम ४५२, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे कथन करुन खटला चालविण्याची विनंती केली. आरोपींचा बचाव पूर्णतः नकाराचा आहे. आरोपींविरुध्द सबळ पुरावा आढळून न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये बयान नोंदविण्यात आले नाही.

५. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ.एम.एस.सुपारे व आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. एस. जी. सावळे यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रकरणात दाखल कागदोपत्री पुरावा यांचा विचार करता माझ्यासमक्ष खालील मुद्दे प्रकरणाच्या निर्णयासाठी विचारार्थ आहेत. सदर मुद्यावर कारणमीमांसेसह माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, दिनांक २०/०९/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी संगीता खिल्लारे हिच्या घरी, मौजा करंजी, ता. मालेगांव, जि. वाशिम येथे सर्व आरोपींनी एकमेकांसोबत संगनमत करून समान उद्देश ठेउन अनाधिकाराने व अनाधिकृतपणे फिर्यादीच्या घरात घुसुन फिर्यादी, विजयानंद व अंकीता यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन जीवाने मारण्याची धमकी दिली होती काय? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय ? | आरोपींची सुटका. |

## कारणमिमांसा

## मुद्दे क्र.१ व २ करिता

६. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी एकूण ३ साक्षीदार तपासले आहेत. साक्षीदार क्र.१ फिर्यादी संगीता राजु खिल्लारे, साक्षीदार क्र.२ अंकीता प्रमोद पोफळे व साक्षीदार क्र. ३ विजयानंद गुलाब खिल्लारे यांची साक्ष अनुक्रमे नि.क्र.३८, ४१ व ४२ वर नोंदविण्यात आलेली आहे.

७. साक्षीदार क्र.१ फिर्यादी संगीता खिल्लारे हिने तिच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, ती आरोपींना ओळखते कारण ते तिचे नातेवाईक आहेत. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की, कथित घटना कधी घडली होती, कुठे घडली होती आणि काय घडली होती याबाबत तिला काहीही माहित नाही. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की, तिने रागाच्या भरात आरोपींविरुद्ध फिर्याद दिली होती. फिर्यादीने जबानी रिपोर्ट नि.क्र.३९ आणि छापील प्रथम खबरी अहवाल नि.क्र.४० यांच्यावरील सह्या मान्य केल्या; परंतु त्यातील मजकूर माहीत नसल्याचे कथन केले. फिर्यादीने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही म्हणून सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना फिर्यादीची उलटतपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली, परंतु फिर्यादीला उलटतपासात विचारण्यात आलेल्या सर्व सूचक प्रश्नांची फिर्यादीने नकारार्थी उत्तरे दिली. फिर्यादीने उलटतपासात तिच्या जबानी रिपोर्टमधील अधोरेखांकित भाग अ पोलिसांनी का नमूद केला याचे कारण सांगू शकत नसल्याचे कथन केले. फिर्यादीचा उलटतपास आरोपींच्या विधिज्ञांनी नाकारला. फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादीने अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केले नाही. फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे सुद्धा निदर्शनास येते की, फिर्यादीने तिच्या पुराव्यात आरोपींविरुद्ध काहीही कथन केलेले नाही. सबब, सदरील कारणास्तव फिर्यादीची साक्ष ग्राह्य धरता येत नाही.

८. साक्षीदार क्र.२ अंकीता पोफळे व साक्षीदार क्र.३ विजयानंद खिल्लारे यांनी त्यांच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, ते आरोपींना ओळखतात कारण ते त्यांचे नातेवाईक आहेत. साक्षीदार क्र.२ अंकीता पोफळे हिने तिच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, फिर्यादी ही तिची काकु आहे. साक्षीदार क्र.३ विजयानंद खिल्लारे हिने तिच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, फिर्यादी ही तिची जाऊ आहे. सदर साक्षीदारांनी पुढे असे कथन केले आहे की, कथित घटना कधी

घडली होती, कुठे घडली होती आणि काय घडली होती याबाबत त्यांना काहीही माहित नाही. सदर साक्षीदारांनी पुढे असे कथन केले आहे की, पोलिसांनी त्यांचे बयान नोंदविले नव्हते. सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही म्हणून सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना सदर साक्षीदारांची उलटतपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली, परंतु सदर साक्षीदारांनी उलटतपासात विचारण्यात आलेल्या सर्व सूचक प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली. सदर साक्षीदारांनी उलटतपासात त्यांच्या बयानातील अधोरेखांकित भाग अ पोलिसांनी का नमूद केला याचे कारण सांगू शकत नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदारांचा उलटतपास आरोपींच्या विधिज्ञांनी नाकारला. सदर साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केले नाही. सदर साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे सुद्धा निदर्शनास येते की, सदर साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात आरोपींविरुद्ध काहीही कथन केलेले नाही. सबब, सदरील कारणास्तव सदर साक्षीदारांची साक्ष ग्राह्य धरता येत नाही.

९. अभिलेखाची पडताळणी केली असता असे सुध्दा निदर्शनास येते की, फिर्यादी आणि सर्व आरोपींची न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झालेली आहे, त्याप्रमाणे त्यांनी अभिलेखावर आपसात तडजोड लेख नि.क्र.३७ दाखल केलेला आहे.

१०. आरोपींच्या विधीज्ञांनी घटनास्थळ पंचनामा व जखमी साक्षीदार क्र.३ विजयानंद गुलाब खिल्लारे हिचे वैद्यकिय प्रमाणपत्र मान्य केले असल्यामुळे त्यांना अनुक्रमे नि.क्र.४३ व ४४ देण्यात आलेले आहे.

११. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र.१ फिर्यादी संगीता खिल्लारे हिची साक्ष महत्वाची होती; परंतु फिर्यादीने अभियोगपक्षाला कोणत्याही प्रकारे सहकार्य केले नाही. साक्षीदार क्र.२ अंकीता पोफळे व साक्षीदार क्र.३ विजयानंद खिल्लारे यांनी सुध्दा अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केलेले नाही. घटनास्थळ पंचनाम्याला नि.क्र.४३ देण्यात आले तरी घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर सिध्द झालेला नाही, तसेच कथित घटनास्थळ सिध्द झालेले नाही. जबानी रिपोर्ट नि.क्र.३९, छापील प्रथम खबरी अहवाल नि.क्र.४०, घटनास्थळ पंचनामा नि.क्र.४३ व साक्षीदार क्र.३ जखमी विजयानंद गुलाब खिल्लारे हिचे वैद्यकिय प्रमाणपत्र नि.क्र. ४४ यांना निशाणी क्रमांक देण्यात आले असले तरी आरोपींनी गुन्हा केला याबाबत इतर कोणताही कागदोपत्री किंवा तोंडी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा आरोपींविरुध्द कोणताही गुन्हा सिध्द करण्यास पात्र नाही, त्यामुळे सर्व आरोपी सुटण्यास पात्र आहेत. वरील सर्व विवेचनावरुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ ते ३ यांची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधान, १८६० च्या कलम ४५२, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ नुसार शिक्षा पात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातून सुटका करण्यात येत आहे.

२. आरोपी क्र.१ ते ३ यांचे वैयक्तीक व जमानत पत्र रद्द करण्यात येते.

३. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या तरतुदीच्या पुर्ततेसाठी आरोपी क्र.१ ते ३ यांनी प्रत्येकी १५,०००/- रू.चा वैयक्तीक जातमुचलका व तेवढ्याच रकमेचा जामीन मुचलका द्यावा.

[न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.]

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MOHMAD WASIM AKRAM MOHMAD JALAL SHEAIKH
Date: 2026.06.11 17:41:40 +0530

दिनांकः ११/०६/२०२६.

मोहम्मद वसीम अक्रम
पि. मोहम्मद जलाल शेख
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट क्र.१), मालेगांव.

# सूची–I

## अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोगपक्षाचे साक्षीदारः–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१–नि.क्र.३८ | संगीता राजु खिल्लारे | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२–नि.क्र.४१ | अंकीता प्रमोद पोफळे | साक्षीदार |
| अ.सा.क्र.३–नि.क्र.४२ | विजयानंद गुलाब खिल्लारे | जखमी साक्षीदार |

### ब. आरोपीचे साक्षीदार, असल्यासः–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

### क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यासः–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

## अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन निशाणी क्रमांकांची यादी

### अ. अभियोगपक्षः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ३९ | जबानी रिपोर्ट |
| २ | ४० | छापील प्रथम खबरी अहवाल |
| ३ | ४३ | घटनास्थळ पंचनामा |
| ४ | ४४ | जखमी साक्षीदार क्र.३ विजयानंद गुलाब खिल्लारे हिचे वैद्यकिय प्रमाणपत्र |

**ब. आरोपीः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**ड. मुद्देमालः–**

| अ.क्र. | वस्तू/आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MOHMAD WASIM AKRAM MOHMAD JALAL SHEAIKH
Date: 2026.06.11 17:41:48 +0530

दिनांकः ११/०६/२०२६.

मोहम्मद वसीम अक्रम
पि. मोहम्मद जलाल शेख
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट क्र.१), मालेगांव.

## CERTIFICATE

**I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.**

| | |
|---|---|
| Name of Stenographer | T. R. Ugale (Grade III ) |
| Name of Court | **Shri. M. W. A. M. J. Sheaikh,**<br>C.J.J.D. & J.M.F.C., (Court No.1), Malegaon, Distt. Washim. |
| Date of Dictation | 11/06/2026 |
| Judgment/Order signed by the PO on | 11/06/2026 |
| Judgment /Order uploaded on | 11/06/2026 |